Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य/उमा/३८६१
दिनांक : १८/१२/२०२४

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रु -मार्च २०२५ परीक्षेतील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित करणे व परीक्षा केंद्र भौतिक सुविधा पाहणीबाबत.**

**संदर्भ:- दि.११, १२ व १७/१२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेत मा.विभागीय अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेकरीता संदर्भीय सभेत आवश्यक सूचना सर्व शाळाप्रमुखांना देण्यात आलेल्या आहेत. परीक्षा गैरमार्ग व कॉपीमुक्त होण्यासाठी तसेच परीक्षेमध्ये गुणात्मक बदल होण्यासाठी विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच परीक्षा संचालनासाठी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे आपल्या स्तरावरुन तातडीने नियोजन करावे.

**(१) शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्याकरीता जिल्हास्तरावर उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे.**

(अ)विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिका कशी लिहावी (ब) अभ्यासावर लक्ष्य कसे केंद्रित करावे (क) परीक्षेस तणावमुक्त व निर्भिडपणे कसे सामोरे जावे (ड) अभ्यासाचे नियोजन - वेळापत्रक (इ) परीक्षापूर्व व परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांनी घ्यायची आरोग्याची काळजी इ. करीता जिल्हास्तरावरुन २ ते २.३० तासांचे ऑनलाईन उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित करावा. यासाठी जिल्ह्यातील मानसोपचार तज्ञ, समुपदेशन करणारे डॉक्टर आणि इंग्रजी, गणित व विज्ञान यासह सर्व विषयाच्या अचूक व नेमकेपणाने उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी मार्गदर्शन करणारे तज्ञ यांचा सहभाग घ्यावा. आवश्यक अशा तज्ञांची उपलब्धता जिल्हा मुख्याध्यापक संघटनांच्या मदतीने करावी. एखाद्या शाळेत अथवा सभागृहात मर्यादित संख्येत इ.१०वी / इ.१२वीचे परीक्षार्थी, पालक, शिक्षक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम दि.०१/०१/२०२५ ते ०४/०१/२०२५ या कालावधीत कोणत्याही एका दिवशी आयोजित करावा. त्याचे लाईव्ह प्रक्षेपण Youtube, Facebook व्दारे टेक्नोसेव्ही व्यक्ती / शिक्षक यांच्या मदतीने जिल्ह्यातील सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यासाठी करावे. कार्यक्रमाची लिंक कार्यक्रमापुर्वी किमान एक दिवस अगोदर सर्वांना उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी. या कार्यक्रमास जिल्हास्तरावरुन उचित प्रसिध्दी द्यावी.

**(२) परीक्षा केंद्र असलेल्या शाळा/ क.महाविद्यालयातील भौतिक सुविधांची तपासणी करणे.**

परीक्षा केंद्र असलेल्या शाळा / क.महाविद्यालयात आवश्यक असलेल्या सुविधा - सर्व वर्गखोल्यामध्ये व शालेय आवारात चालू स्थितीतील CCTV कॅमेरे, आवश्यक संख्येइतके बेंचेस, वीजदिवे, पंखे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहाची उपलब्धता, संरक्षक भिंत, खिडक्यांची दुरुस्ती व जाळी बसविणे, वीजेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर अथवा इनव्हर्टर इ. यांची उपलब्धतेबाबत तपासणी आपल्या अधिनस्त उपशिक्षणाधिकारी / गटशिक्षणाधिकारी / विस्तार अधिकारी यांच्यामार्फत दि.१०/०१/२०२५ अखेरपर्यंत करावी. त्रुटी आढळून आल्यास त्यांची

पुर्तता करण्यासाठी सूचित करावे. या मुदतीनंतर विभागीय मंडळामार्फत परीक्षा केंद्र असणाऱ्या शाळांना आकस्मित भेटी देण्यात येतील. त्यावेळी भौतिक सुविधांच्या बाबतीत कमतरता, त्रुटी, अनुपलब्धता आढळून आल्यास संबंधित शाळाप्रमुखांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येणार आहे. सबब आपल्या जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरुन निर्गमित कराव्यात. तसेच आपण स्वतः व अधिनस्त अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांना भेटी देवून विहित मुदतीत नियोजनपुर्वक प्रत्यक्ष पाहणी करुन सोबतच्या नमुन्यात केंद्रनिहाय अहवाल विभागीय मंडळास सादर करावा.

**( सुभाष रा.चौगुले )**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर** - मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे

प्रत कार्यवाहीस्तव - विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

## प्रपत्र - अ. परीक्षा केंद्र भौतिक सुविधा पाहणी अहवाल

जिल्हा - तालुका - परीक्षा केंद्र क्रमांक -

परीक्षा केंद्र शाळेचे नाव - इयत्ता - १०वी / १२वी

मुख्याध्यापक / प्राचार्यांचे नाव - मोबाईल नं.-

| अ.क्र. | भौतिक सुविधा प्रकार | स्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | वापरण्यायोग्य संख्या | अयोग्य / बंद संख्या | |
| १ | एकूण वर्गखोल्या | | | |
| २ | त्यापैकी २५ बेंचेस क्षमतेच्या वर्गखोल्या | | | |
| ३ | बेंचेस | | | |
| ४ | वीज दिवे / ट्युब | | | |
| ५ | पंखे (सीलींग फॅन) | | | |
| ६ | जनरेटर / इनव्हर्टर | | | |
| ७ | शाळा आवार व प्रत्येक वर्गखोलीत CCTV कॅमेरे | | | |
| ८ | पिण्याच्या पाण्याची टाकी | | | |
| ९ | पाणी उपलब्धता / क्षमता | | | |
| १० | मुलींसाठी स्वच्छतागृह | | | |
| ११ | मुलांसाठी स्वच्छतागृह | | | |
| १२ | शाळेची संरक्षक भिंत सुस्थितीत आहे काय ? | | | |
| १३ | शाळेत प्रवेश करण्यासाठी उपलब्ध असलेल्या गेटची संख्या व स्थिती ? | | | |
| १४ | वर्गखोल्यांच्या सर्व खिडक्यांना सुस्थितीत जाळी लावलेली आहे का ? | | | |
| १५ | उपरोक्त मुद्याशिवाय आढळून आलेली अन्य त्रुटी नमूद करावी. | | | |
| १६ | परीक्षा केंद्रावरील भौतिक सुविधांबाबत तपासणी अधिकाऱ्यांचे सुस्पष्ट अभिप्राय - | | | |

केंद्रशाळा प्रमुखांची स्वाक्षरी-
पदनाम -
दिनांक - / /

१. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी
नाव -
पदनाम -
मोबाईल नं.-

२. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी
नाव -
पदनाम -
मोबाईल नं.-